सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. 03 ठ. क्र. 04 दि. 5/6/17 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९५ नुसार सन २०१६-१७ चे सुधारित व सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक अ व क मा.आयुक्त यांनी दिनांक २८/२/२०१७ रोजी मा.स्थायी समितीकडे सादर केलेले आहे.मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १०४३ दिनांक ३१/३/२०१७ अन्वये सन २०१६-१७ चे सुधारित अंदाजपत्रकास शिफारस करण्यांत येत असून,सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकामध्ये फेर बदल करुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १०० अन्वये मान्यता मिळणेस्तव आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.मा.स्थायी समितीने शिफारस केलेले सन २०१६-१७ चे सुधारित अंदाजपत्रक मंजूर करणेत येत आहे.तसेच सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकात खालीलप्रमाणे फेरबदल करुन प्रस्तुत बदलासह सुचना शिफारशीसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १०० अन्वये अंदाजपत्रकास मान्यता देणेत येत आहे.

**महसुली जमा बाजू**

| पान नं. | अ.क्र | जमा विवरण | मा.स्थायी समितीने सुचविलेला अंदाज | मा.म.न.पा.ने केलेला बदल | | मा.म.न.पा.ने केलेला अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | वाढ | कपात | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १४ | १ | **सर्वसाधारण कर, अप्रत्यक्ष कर व इतर जमा** | | | | |
| | झ | मिळकतीचे सर्व्हे करुन उत्पन्न वाढविणे | २५,००,००,००० | १०,००,००,००० | ---- | ३५,००,००,००० |
| १५ | | **इतर जमा** | | | | |
| | ९ | समाज मंदिर, अभ्यासिका, शिवणवर्ग व महिला बालकल्याण भाडे | १२,००,००० | १३,००,००० | ---- | २५,००,००० |
| १६ | २ | **हद्दवाढ विभाग** | | | | |
| | ८ | मिळकतीचे सर्व्हे करुन मिळणारे उत्पन्न | २५,००,००,००० | १०,००,००,००० | ---- | ३५,००,००,००० |
| १७ | ०४ | **लोकारोग्य** | | | | |
| | झ | आरोग्य परवाना शुल्क | २०,००,००० | २०,००,००० | ---- | ४०,००,००० |
| | त्र | कच-यापासून उर्जा निर्मिती | ---- | २,००,००,००० | ---- | २,००,००,००० |
| १८ | ०६ | **पथांची झाडलोट कचरा वाहतूक वगैरे** | | | | |
| | घ | इतर जमा सेप्टीक टँक | ५,००,००० | १५,००,००० | ---- | २०,००,००० |
| | ७ क | **पथ व इमारती** | | | | |
| | ०६ | खाजगी लेआऊट रस्ते ड्रेनेज सुपरव्हीजन चार्जेस | ३,००,००,००० | २,००,००,००० | ---- | ५,००,००,००० |
| | ०७ | आस्थापना सामुग्री आराखडा आकारणे | १५,००,००,००० | ५,००,००,००० | ---- | २०,००,००,००० |
| | १० | जाहिरातीपासून उत्पन्न दिशादर्शक कमान | १०,००,००० | ९०,००,००० | ---- | १,००,००,००० |
| | ११ | अनाधिकृत बांधकाम शोध व दंड नियमीत करणे | २०,००,००,००० | ५,००,००,००० | ---- | २५,००,००,००० |
| १९ | ०८ | **भवने व भूमी यांची व्यवस्था** | | | | |
| | ०७ | मनपा गाळयांचे अनामत रक्कम व भाडेवाढ केल्याने येणारे उत्पन्न | २५,००,००,००० | १०,००,००,००० | ---- | ३५,००,००,००० |
| नविन सदर | ०८ | अधिकृत अनाधिकृत ओपन जागा भाडेवाढ व डिपॉझीटपोटी जमा | ---- | २०,००,००,००० | ---- | २०,००,००,००० |

उपरोक्त बदलामुळे एकूण बेरजेत खालील प्रमाणे बदल करण्यांत येत आहे.

पृष्ठ क्र.२३ वरील १ ते १४ ची बेरीज र.रुपये ५४०,६४,४६,०००/- ऐवजी र.रुपये ६०६,०२,४६,०००/- इतकी येते.शिलकेसह एकूण र.रुपये ६०६,०५,०३,४०१/- इतकी येते.

(signature)
नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/प्रासंगिक/विशेष सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.नं. 04 ठ. क्र. 06 दि. 5/5/17 रोजी ठेवला खालील प्रमाणे ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



मा. स्थायी समिती ठराव क्र. १०४४ दि. ३१/०३/२०१७ नुसार मा. परिवहन समिती सन २०१६-१७ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१७-१८ चे **अंदाजपत्रक-ब** यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९८ नुसार मा. स्थायी समितीचे शिफारसीनुसार कलम १०० अन्वये मा. महानगरपालिकेची मान्यता मिळणेस्तव आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

मा. परिवहन समितीने सूचविलेल्या मा. स्थायी समितीने शिफारस केलेल्या सन २०१६-१७ चे सुधारित अंदाजपत्रकास मान्यता देणेत येत आहे. परिवहन उपक्रमाचे सन २०१७-१८ चे मा. परिवहन समिती व मा. स्थायी समितीने शिफारस केलेले **अंदाजपत्रक-ब** मध्ये पुढीलप्रमाणे दुरूस्त करून सूचना व शिफारसीसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १०० अन्वये मान्यता देणेत येत आहे.

**जमा बाजू-**

| अ.क्र. | विवरण | मा. परिवहन समितीने सूचविलेला अंदाज | मा. म.न.पा. ने केलेली तरतूद | मा. म.न.पा. ने केलेली तरतूद | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | वाढ | कपात |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १अ | बसभाडे | २०,००,००,०००/- | २२,००,००,०००/- | २,००,००,०००/- | ---- |
| क१ | जाहिरातीचे उत्पन्न व बस शेड | १७,९८,०००/- | २५,००,०००/- | ७,०२,०००/- | ---- |
| १३ | जुने बसेस विक्री | ५६,००,०००/- | ७०,००,०००/- | १४,००,०००/- | ---- |
| १४ | मा.म.न.पा.कडून अनुदान | ३५,४१,७५,५३८/- | १०,००,००,०००/- | ---- | २५,४१,७५,५३८/- |
| १५ | परिवहन कडील सात रस्ता सब डेपो बी.ओ.टी.तत्वावर विकसीत करणे | ---- | २३,८०,७३,५३८/- | २३,८०,७३,५३८/- | ---- |
| | एकूण | | | २६,०१,७५,५३८/- | २५,४१,७५,५३८/- |

| | | |
|---|---|---|
| एकूण जमेत वाढ | रक्कम रू. | २६,०१,७५,५३८/- |
| एकूण जमेत कपात | रक्कम रू. | २५,४१,७५,५३८/- |
| एकूण जमेत वाढ | रक्कम रू. | ६०,००,०००/- |
| मा. परिवहन समिती यांनी सूचविलेली एकूण जमा | रक्कम रू. | ८२,५६,८८,५३८/- |
| मा. म.न.पा.ने सूचविलेली जमेत वाढ | रक्कम रू. | ६०,००,०००/- |
| मा. म.न.पा.ने सूचविलेली एकूण जमा | रक्कम रू. | ८३,१६,८८,५३८/- |

Gautham P.

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/प्रमुख/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ...05..ठ. क्र....06 दि...5/6/18.....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

प्राथमिक मंडळाचे सन २०१७-१८ चे प्राथमिक शिक्षण व बिगर प्राथमिक शिक्षणाचे अंदाजपत्रक प्रशासनाधिकारी यांनी तयार केलेले असून, सदरच्या अंदाजपत्रक प्राथमिक शिक्षण मंडळ प्रशासनाधिकारी यांनी जा.क्र. २७६२ दि. ९/ ३/२०१७ ने मंजूर करून महापालिकेच्या मान्यतेस्व सादर केलेले आहे. सदर अंदाजपत्रकात आवश्यक दुरूस्ती व तरतुदी सुचविण्यात आलेल्या आहेत. सबब प्रस्तुत अंदाजपत्रकास मान्यता मिळणेस्तव मा.आयुक्त यांचे दि. २३/ ३/२०१७ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

प्राथमिक शिक्षण मंडळाचे सन २०१७-१८ चे बिगर प्राथमिक शिक्षणाचे अंदाजपत्रकात पुढील फेर फार करून सूचना शिफारशीसह मान्यता देण्यात येत आहे.

**महानगरपालिका बिगर प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर**

| अ.नं. | तपशिल | मा.आयुक्त यांचा अंदाज | मा.मनपाने केलेले फेर बदल | | मा.मनपाने मान्य केलेला अंदाज |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | कमी | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ५ | क्रिडा महोत्सव | १,००,००० | १,००,००० | - | २,००,००० |
| ६ | शालेय लाईट खर्च व नविन कनेक्शन घेणे | १,५०,००० | १,५०,००० | - | ३,००,००० |
| १२ | बालवाडी ते ७ वीच्या विद्यार्थ्यांना गणवेष (प्रत्येकी दोन गणवेष) | ५,००,००० | ५,००,००० | - | १०,००,००० |
| १३ | स्कूल बॅग/ वॉटर बॅग/शुज/ | २,००,००० | २,००,००० | - | ४,००,००० |
| १४ | शालेय खेळाचे साहित्य खरेदी | ५०,००० | ५०,००० | - | १,००,००० |
| १८ | नियमीत व रोजंदारी ड्रायव्हर पगार व भत्ते | ५,००,००० | - | ५,००,००० | - |
| ३२ | गणीत, इंग्रजी व विज्ञान पेटी / प्रयोग शाळा साहित्य घेणे | १,००,००० | - | १,००,००० | - |
| ३७ | मा. सभापती मोटार खर्च व इंधन बिल | २,००,००० | - | २,००,००० | - |
| ३८ | सभापती नविन मोटार गाडी जादा तरतूद | ६,५०,००० | - | ६,५०,००० | - |
| ४७ | २५ शिक्षकांची मनपाच्या मान्यतेने मानधनावर नेमणूक करणे | ५,००,००० | ८,००,००० | - | १३,००,००० |
| ५० | स्मार्ट स्कूल | ५,००,००० | २०,००,००० | - | २५,००,००० |
| ५४ | हद्दवाढ भागात नविन पाच बालवाडी सुरु करणे (पाच शिक्षीका व पाच सेविका नेमणे) | २,००,००० | ५,००,००० | - | ७,००,००० |

उपरोक्त बदलामुळे एकूण बिगर प्राथमिक अंदाजपत्रकाची बेरीज र.रू.४,००,४७,०००/- ऐवजी र.रू. ४,२८,९७,०००/- इतकी येते.

[signature]

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.अ...४...ठ. क्र.....५
दि...५/५/१७.....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिका रोजंदारी कर्मचा-यांची भविष्य निर्वाह निधीची मनपा हिश्श्याची रक्कम भविष्य निर्वाह निधी कार्यालयात जमा करणेबावत प्रस्तावात नमूद कारणास्तव सोलापूर महानगरपालिकेतील एकूण २९७ इतक्या रोजंदारी कर्मचा-यांचे माहे फेब्रुवारी २०१७ च्या वेतनातून १२ टक्के इतकी भविष्य निर्वाह निधी वर्गणीची रक्कम कपात करणेत आलेली आहे. आजला एकूण २९७ इतक्या रोजंदारी सेवकांची माहे फेब्रुवारी २०१७ ची अंदाजित रक्कम रु. २,८५,०७९/- इतकी होत आहे. त्यानुसार सोलापूर महानगरपालिकेच्या हिश्श्यापोटी १३.३६ टक्के प्रमाणे इतकी अंदाजित र.रु. ३,१७,३१८/- होत असून, याप्रमाणे रोजंदारी सेवकांच्या वेतनातून १२ टक्के प्रमाणे कपात होणारी रक्कम व महानगरपालिकेच्या हिश्श्यापोटी १३.३६ टक्के प्रमाणे होणारी एकुण अंदाजीत र.रु. ६,०२,३९७/- इतकी होत असून सदरची रक्कम भविष्य निर्वाह निधी कार्यालयाने दिलेल्या पी.एफ.कोड नं. १०६२१५ मध्ये कायद्याने जमा करणे बंधनकारक आहे तसेच जानेवारी २०११ पासून फेब्रुवारी २०१३ च्या चौकशी कालावधी पावेतो रक्कम हिशोबाअंती भरणेही बंधनकारक आहे. वरील बाब ही धोरणात्मक स्वरुपाची असल्याने सोलापूर महानगरपालिकेच्या हिस्स्याची २९७ रोजंदारी कर्मचा-यांची १३.३६ टक्के प्रमाणे होणारी रक्कम दरमहा भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे जमा करणेकरिता मा.मनपा सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १६-३-१७ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

मनपा कर्मचा-यांच्या वेतनातून कपात केल्याने नियमीतपणे सदरची रक्कम दरमहा भरण्याची दक्षता संबंधित अधिका-यांनी घ्यावी.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज...६...ठ. क्र....९...
दि...५/६/१९६...रोजी ठेवता झालेला प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



म.न.पा. आस्थापनेवरील नगर अभियंता या पदी पात्र अधिका-यांच्या नियुक्तीबाबत मा.आयुक्त यांनी पाठविलेली टिपणी व त्यामध्ये पात्र असलेल्या अधिका-यांच्या यादीचे अवलोकन केले.

नगर अभियंता हे पद एकल असल्याने त्या ठिकाणी आरक्षणाचा विचार करता येणार नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ४५(१) नुसार या पदाच्या नियुक्तीचा संपूर्ण अधिकार मा.महानगरपालिकेस आहे.

मा.आयुक्त यांनी पाठविलेल्या यादीतील पात्र नावापैकी श्री.व्हि.बी.राठोड यांना यापूर्वी सार्वजनिक आरोग्य अभियंता विभागाकडील पाणी पुरवठ्याविषयी विशेष प्रशिक्षणासाठी पाठविण्यात येऊन, प्रशिक्षणाचा खर्च म.न.पा.कडून करणेत येऊन त्या पुर्ततेअंती त्यांची सार्व.आरोग्य अभियंता या विभागाकडे खास बाब म्हणून अवेक्षक या पदावरुन थेट उप अभियंता या पदी दि.१६-४-२००३ रोजी पदोन्नतीने नियुक्ती केलेली आहे. सदरचे प्रशिक्षण हे केवळ पाणी पुरवठ्याशी निगडीत असलेने नगर अभियंता या पदासाठी त्यांचा विचार करता येणार नाही.

तसेच श्री.दुलंगे जी.एम. उप अभियंता यांचा सेवेचा काळ हा सर्वात जास्त आहे. परंतु सेवा प्रवेश नियमानुसार ते उच्च शैक्षणिक पात्रता धारण करीत नाहीत. तसेच त्यांची जास्तीत जास्त सेवा ही नगर अभियंता खात्याकडे न होता पाणी पुरवठा विभागाकडे झालेली आहे. प्रस्तावात नमूद यादीतील श्री.कारंजे एस.बी. सहाय्यक अभियंता यांचे शिक्षण हे एम.टेक (हायवे इंजिनियरींग) हे पदव्युत्तर पदवीधारकाचे असल्याने शासनाने देखील नविन तयार केलेल्या सेवा भरती नियमामध्ये या गोष्टीला प्राधान्य दिले आहे  तसेच श्री.कारंजे एस.बी. यांची सेवा २१ वर्षे झालेली असून त्यांच्या सेवेचा संपूर्ण काळ नगर अभियंता या विभागाकडे झालेला असल्यामुळे त्या सेवेचा जास्तीत जास्त अनुभव त्यांना आहे त्याचबरोबर श्री.कारंजे एस.बी. हे ओ.एस.डी. म्हणून मा.मंत्री महोदयांचे स्विय्य सहाय्यक म्हणून काम केलेले असल्यामुळे त्यांना मंत्रालयीन कामकाजाचीदेखील पूर्ण माहिती आहे. यामुळे सोलापूर महानगरपालिकेला मा.महाराष्ट्र शासनाचे संबंधीत कामकाजामध्ये सोयीस्करपणा येईल. या सर्व गोष्टींचा विचार करुन त्यांची उच्च शैक्षणिक पात्रता व इतर तद्‌अनुषंगिक बाबींचा विचार करता १९४९ चे कलम ४५ (१) नुसार नगर अभियंता या पदासाठी श्री.कारंजे एस.बी. हेच योग्य उमेदवार असल्याचे दिसून येते त्यामुळे १९४९ चे कलम ४५(१) नुसार श्री.कारंजे एस.बी. यांची नगर अभियंता या पदी निवड करण्यात येत आहे.

श्री.एस.बी.कारंजे यांचे नगर अभियंता पदावरील नियुक्तीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५(४) नुसार मा.महाराष्ट्र शासनाकडे मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविण्यास ही सभा मान्यता देत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज....८....ठ.क्र......१०
दि...५/१/८/१९८...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
एकमताने/सर्वानुमते पास झाला.

०८

सो.म.न.पा. सेवानिवृत्त सेवकांना अद्याप सहाव्या वेतन आयोग फरकाची रक्कम आदा झाली नाही. वेळोवेळी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात प्रत्येकवर्षी र.रुपये ४.०० कोटीची तरतूद करुनही रक्कम आदा करणे शक्य झालेले नाही. सदर फरकाची रक्कम आदा करणेकामी र.रु. १६ कोटी ३० लाख इतकी आवश्यकता आहे. तरी दि. १-१-२००६ ते ३१-१-२०११ अखेर सेवानिवृत्त मनपा सेवकांना पेन्शन, निवृत्ती वेतन, ग्रॅच्युएटी, पेन्शन विक्री, व रजा रोखीकरण तसेच फरकाची रक्कम आदा करावयाची बाकी आहे.

महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने सदरची रक्कम मा. महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त करुन घेणेकामी प्रयत्न करणेकामी सदरचा ठराव व प्रशासकीय प्रस्ताव मा. अर्थखाते व नगरविकास खाते महाराष्ट्र शासन यांचेकडे पाठविणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. आयुक्त यांनी अभिप्राय द्यावा.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ....६...ठ. क्र....११
दि..५।८।१८....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

सोलापूर महानगरपालिकेच्या विधान सल्लागारपदी कार्यरत असलेले श्री. सोनटक्के हे चुकीचे निर्णय घेत असून, त्यांच्यामुळे सोलापूर महानगरपालिकेचे कोटयावधीचे नुकसान होत आहे. श्री. सोनटक्के हे कोणतेही निर्णय स्वतः न घेता इतरांवर सोपवत असतात. अशा अकार्यक्षम विधानसल्लागाराचे बडतर्फी करुन मनपाच्या आर्थिक नुकसानीस जबाबदार धरुन त्यांच्याकडून झालेली नुकसान भरपाई त्वरीत वसूल करण्यास व बडतर्फीस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. आयुक्त यांनी अभिप्राय द्यावा.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/प्राथमिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 90 ठ. क्र. 92
दि. 5/6/17 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१०

कल्पना नगर अक्कलकोट रोड येथील अंतर्गत मलनित्सारण निचरा होण्यासाठी ड्रेनेज लाईन टाकणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयांकित कामाचे पूर्वगणनपत्रक क्र. १७/२०१६-१७ र.रु. १९,५९,९००/- इतकेचे तयार करणेत आले असून, सदर कामाकरिता बजेट तरतूद उपलब्ध नसल्याने सदरचे काम महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान जिल्हास्तर मधून बजेट उपलब्ध होणेस्तव मा. जिल्हा नियोजन अधिकारी यांचेकडे प्रस्ताव सादर करणेकामी मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस्तव मा. आयुक्त यांचे दि. १३-४-१७ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

(signature) for P.P.
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/प्रथमुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ...99...ठ. क्र....93
दि...५/६/२०१७...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



जय मल्हार नगर बाळे येथे ड्रेनेज लाईन टाकणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयांकित कामाचे पूर्वगणनपत्रक क्र. २/२०१७-१८ र.रु. ३०,३६,३६९/- इतकेचे तयार करणेत आले असून, सदर कामाकरिता बजेट तरतूद उपलब्ध नसल्याने सदरचे काम महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान जिल्हास्तर मधून बजेट उपलब्ध होणेस्तव मा. जिल्हा नियोजन अधिकारी यांचेकडे प्रस्ताव सादर करणेकामी मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस्तव मा. आयुक्त यांचे दि. १३-४-१७ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

Gaikwad P.P.
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.912...ठ. क्र......98
दि...9.11.1.916...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्रभाग क्र. १ तुळजापूर रोड फुट रस्ता येथे १५ लाख लिटर क्षमतेची उंचावरील टाकी बांधणे व ट्रान्समिशन व डिस्ट्रीब्युशन पाईप लाईन घालणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण जिल्हास्तर अंतर्गत समाविष्ठ असलेल्या महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना अंतर्गत प्राप्त होणा-या अनुदानातून करावयाचे असलेने सदर योजना अंतर्गत ७० टक्के मा. शासन यांचेकडून प्राप्त होणार आहे व ३० टक्के मनपा हिस्सा महानगरपालिकेचे भरावयाचे आहे. विषयांकित कामाचे सविस्तर पूर्वगणनपत्रक क्र. सन २०१६-१७ र.रु. २,७३,८५,७००/- इतकेचे तयार करणेत आले असून, सदर कामास पूर्वगणनपत्रकाच्या ३० टक्के रक्कम रुपये ही म.न.पा.कडून तरतूद करणेचे असलेने सदर तरतूद उपलब्ध करणेस व सदरचे पूर्वगणनपत्रकास मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज...९३...ठ. क्र.......९५
दि...५/११/१९५...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

सोलापूर शहरातील सर्व मिळकतदारांकडून सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने युजर चार्जेस वसूल केले जाते. वास्तविक पाहता ज्या ठिकाणी ड्रेनेज लाईन नाही. त्या ठिकाणीही युजर चार्जेस घेतले जाऊ नये. परंतू सदर ठिकाणीही युजर चार्जेस घेतले जाते. युजर चार्जेस बंद होईपर्यंत हद्दवाढ भागात ज्या ठिकाणी ड्रेनेज लाईन नाही. त्या ठिकाणी ड्रेनेज लाईन घालेपर्यंत सदर ठिकाणातील मिळकतदारांचे सेप्टीटँक उपसा करणेसाठी कुठल्याही प्रकारची आकारणी न करणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

प्रस्तावकर्त्यांच्या बाबीचा सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकामध्ये निर्णय घेतला असल्यामुळे सदरचा प्रस्ताव दप्तरी दाखल करणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका